**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.३ चा उलटतपास शपथेवर सुरु..**

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. के. निरवडेकर यांचेमार्फत–**

०२. मी एसटी मध्ये चालक म्हणून नोकरी करीत असून दि.२२.११.२०२२ रोजी मी माझ्या डयुटीवर होतो. मी परत ०८.०० वाजता आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी घरी आल्यानंतर बायकोने मला हकिकत सांगितली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समोर कोणतीही घटना घडली नाही. लहू हे माझे सख्खे काका आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचेत घरावरुन वाद चालू आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतची केस सोडून आजून अनेक केसेस आमचेत व आरोपीचेंत चालू असून ते आज रोजी प्रलंबित आहे.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला मजकूर म्हणजेच ‘दि.२२/११/२०२२ रोजी संध्याकाळी ५.४५ च्या दरम्याने सिध्देश लवू चव्हाण याने आमच्या अंगणात कचरा टाकला, त्यावेळी माझी बायको तेथे समोर होती, तेथे अंगणात लघवी केली हे माझ्या बायकोने पाहिले व माझ्या बाबांना सांगितले, तेंव्हा माझ्या बाबांनी त्याला जाब विचारला, तर त्याने बाबांना शिवीगाळ केली, त्यानंतर बाबांनी पोलीस स्टेशन फोन केला, पोलीसांनी येऊन समज दिली, त्यानंतर मी रात्री ८.०० वाजता कामावरुन आलो, मी व माझी बायको अंगणात बसली होती, त्यावेळी माझ्या काकाच्या मुलगा सिध्देश लवू चव्हाण व माझी काकी वैशाली लवू चव्हाण आमच्या अंगणात आले व आम्हांला शिवीगाळ करु लागले, ‘आम्ही तुमच्या अंगणात संडास करुन ठेवू, तुम्ही खा’ असे म्हणू लागले, त्यानंतर पोलीसांत तक्रात केली,’ हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.08.21 17:52:44 +0530

दिनांकः–२१/०८/२०२४

(श्रीमती आर.जी.कुंभार)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.